## १३) नफा आणि तोटा, विक्री आणि खरेदी, साधे आणि चक्रवाढ व्याज

१) कडधान्य विकणारी बाई खोटे वजन वापरत असावी असा शाश्वतला संशय आला. त्याने शोध घेतला तेव्हा ती १ किलो म्हणून केवळ ८०० ग्रॅम धान्य देत होती. तर ती किती टक्के नफा मिळवीत होती?

१) २० २) २५ ३) १० ४) ५०

२) एक माणसाने घोडा व घोडागाडी ३,००० रुपयेला खरेदी केली. त्याने घोडा २०% फायद्याने व घोडागाडी १०% तोट्याने विकली तेव्हा त्यास सर्वासाठी २% फायदा झाला तर घोड्याची खरेदीची किंमत किती ?

१) ₹ १,२०० २) ₹ २,००० ३) ₹ २,४०० ४) ₹ १,५००

३) जर २ अंगठ्या व ४ बांगड्या यांची किंमत ₹ ४६,८५४ असेल, तर ५ अंगठ्या व १० बांगड्यांची किंमत किती?

१) ₹१,१५,३४५ २) ₹१,१७,१३५ ३) ₹१,१६,६७५ ४) ₹१,१२,२३३

४) द.सा.द.शे. १० रुपये दराने १०० रुपये मुद्दलाचे दोन वर्षात चक्रवाढ व्याज किती ?

१) १० रुपये २) २१ रुपये ३) २० रुपये ४) २२ रुपये

## उत्तरे – (१३) नफा आणि तोटा, विक्री आणि खरेदी, साधे आणि चक्रवाढ व्याज

१–२ २–१ ३–२ ४–२